माधवप्रिया
आयुर्वेदिक क्लिनिक व पंचकर्म केंद्र

# माधवप्रिया
आयुर्वेदिक क्लिनिक व पंचकर्म केंद्र

डॉ. संतोष रावसाहेब देशमुख
एम. डी. आयुर्वेद, मुंबई

## षष्टीक पिण्ड स्वेद

सर्व प्रथम सांधे, मान, पाठ, कंबर, पोटऱ्या, इत्यादिपैकी ज्याठिकाणी करावयाचा तेथे दिलेले तेल हलक्या हाताने चोळून लावणे. दिलेले औषध १ पुडी या प्रमाणात एका भाड्यात घेऊन त्यामध्ये 2 तांबे पाणी व १ वाटी दूध टाकावे आणि हे भांडे मंद गॅसवर उकळण्यास ठेवावे.

यानंतर एका भांड्यात 1/2 वाटी तांदूळ, २ चमचे बाळंतशेप, १ वाटी दूध व पाणी घेऊन त्याचा एकत्रितपणे भात शिजवावा. नंतर हा भात स्वच्छ कॉटनच्या फडक्यात (शक्यतो पांढऱ्या) बांधून त्याची पुरचुंडी बनवावी.

ती पुरचुंडी गॅसवर उकळणाऱ्या औषधात बुडवून काढावी व थोडी निथळू द्यावी. नंतर त्या पुरचुंडीचा गरमपणा, पुरचुंडी स्वतःच्या हातावर ठेवून तपासून पहावा. जास्त गरम असल्यास थोडावेळ थांबावे. नंतर या पुरचंडीने रुग्णाच्या तेल लावलेल्या अवयवावर रगडून शेक करावा. पुरचुंडी गार होऊ लागल्यास पुन्हा उकळणाऱ्या औषधात बुडवून काढावी व अशाप्रकारे शेक चालू ठेवावा ठेवावा

1. शेक कमीत कमी अर्धा तास व जास्तीत जास्त १ तास करावा.
2. शेक सुरु असेपर्यंत औषध मंद आचेवर उकळत ठेवावे.
3. हा शेक सकाळ व सायंकाळी असा २ वेळा करावा.
4. सकाळी बनवलेला भात तसेच उकळावयाचे औषध रात्री पुन्हा वापरता येते. मात्र नवीन बनवल्यास अधिक फायदा होतो.

अधिक माहिती करीता खाली दिलेल्या चिन्हांवर क्लिक करा

सर्व आजारांच्या पथ्य-अपथ्यांची अनुक्रमणिका → index

| क्र. | माधवप्रिया शाखा | संपर्क | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | घाटकोपर - प्रमुख शाखा | 7045607187 | |
| २ | कांदिवली | 7304751357 | |
| ३ | गिरगाव | 022-22081081 | |
| ४ | पुणे - तिसरा रविवार | 8169507436 | |
| ५ | कोल्हापूर - पहिला रविवार | 7045607187 | |